॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २१४ वा | मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# भाजप नगरसेवक आणि शिवसेना गटनेते आमने सामने

## सोलापूर महापालिकेत मोठा गोंधळ,शाब्दिक वाद झाल्यानं तणाव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वार्षिक बजेटवेळी मोठा गोंधळ निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. भाजप नगरसेवक आणि शिवसेनेच्या गटनेत्यामध्ये शाब्दिक वाद झाल्याचे पाहायला मिळाले. यामुळं महानगरपालिकेत काही काळ तणाचे वातावरण निर्माण झाले होते.

शिवसेनेचे गटनेते वार्षिक अंदाजपत्रकावरती भाषण करत असताना हा गोंधळ निर्माण झाला आहे.

**महापालिकेच्या सभागृहात काही वेळ तणाव**

वार्षिक अंदाजपत्रकावरती शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे भाषण करत होते. यावेळी भाजपाचे नगरसेवक प्रशांत पल्ली हे मध्ये बोलल्याने वाद निर्माण झाला होता. शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे यांनी आक्रमक होत भाजपाचे नगरसेवक प्रशांत पल्ली यांच्यावर धावून जाण्याचा प्रयत्न केला. मी बोलताना मध्ये तुम्ही बोलण्याचा संबंध काय? असा जाब यावेळी अमोल शिंदे यांनी आक्रमक



भूमिकेत विचारला. या वादामुळे महापालिकेच्या सभागृहात काही वेळ तणाव पाहायला मिळाली. दरम्यान महापौर विनायक कोंड्याल आणि भाजपच्या वरिष्ठ नगरसेकांनी मध्यस्ती करत शांत करण्याचा प्रयत्न केला.

सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत देखील भाजप आणि शिवसेना आमने सामने होते

सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत देखील भाजप आणि शिवसेना आमने सामने आल्याचं पाहायला मिळालं होतं. अंतिम निकाल जाहीर झाला तेव्हा एकूण 102 जागांपैकी भाजपने 87 जागांवर विजय मिळवत स्पष्ट बहुमत प्राप्त केले होते. निवडणूक निकालानुसार एमआयएमने 8 जागा, शिवसेना (शिंदे गट) 4 जागा, काँग्रेस 2 जागा तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) 1 जागा जिंकली होती. त्यामुळं सोलापूर महानगरपालिकेवर भाजपने एकहाती सत्ता मिळवली होती. त्यामुळं भाजपचे विनायक कोंड्याल यांना महापौरपदी संधी देण्यात आली होती. दरम्यान, आता निवडणूक झाल्यानंतर देखीस सभागृहात भाजप आणि शिवसेनेचे नगरसेवक आमने सामने आल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळं सोलापूर महापालिकेत काही काळ तणावाचे वातावरण असल्याचे चित्र दिसत आहे.

सोलापूर महापालिका निवडणुकीत महायुती तुटल्यानंतर भाजप आणि शिवसेना नेत्यांमध्ये जोरदार शाब्दिक युद्ध सुरू झाल्याचे पाहायला मिळाले होते. शिवसेनेचे अमोल शिंदे हे आक्रमकपण पक्षाची भूमिका मांडत होते. त्यानंतर भाजपला या निवडणुकीत मोठं यश मिळालं होतं. तर दुसऱ्या बाजुला शिवसेनेला कमी यश मिळालं. शिवसेनेच्या फक्त चार च जागा निवडून आल्या. यामध्ये अमोल शिदे देखील निवडून आले होते.

## शेळगीतील श्री जागृत मारूती देवस्थानात हनुमान जन्मोत्सवाचा सोहळा: भव्य महाप्रसादाचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील भवानी पेठ परिसरातील शेळगी रोडवरील श्री जागृत मारूती देवस्थानात दरवर्षीप्रमाणे यंदाही हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ५ या वेळेत हा धार्मिक सोहळा पार पडणार असून, यानिमित्त भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

देवस्थानाचे प्रमुख मल्लिनाथ तोटद यांनी आयोजित पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, भवानी पेठेतील



दयानंद महाविद्यालयाजवळील शेळगी परिसरात असलेल्या या देवस्थानात दरवर्षी हनुमान जन्मोत्सव भक्तिभावाने साजरा केला जातो. यंदाही परंपरेनुसार विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, परिसरातील भाविकांचा मोठा प्रतिसाद अपेक्षित आहे.

या सोहळ्यानिमित्त भक्तांसाठी दुपारी १२ ते सायंकाळी ५ या वेळेत महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विरपाक्ष हुणजे, दीपक बोडा, विश्वनाथ बिडवे, सिद्धाराम यलशेट्टी, प्रवीण इरकशेट्टी, मल्लिकार्जुन तोटद, निलेश अंकम, रवी मेळे आदी कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

दरम्यान, या सोहळ्यात अधिकाधिक भाविकांनी सहभागी होऊन हनुमान जन्मोत्सवाचा आनंद घ्यावा, तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थानाच्या वतीने करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेस सिद्धाराम येलशेट्टी, विश्वनाथ बिडवे, प्रवीण इरकशेट्टी, रवी मेळ्ळे, निलेश अंकम आदी उपस्थित होते.

## अमित ठाकरेंनी घेतली बाळासाहेब सरवदेंच्या कुटुंबाची भेट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे प्रमुख अमित ठाकरे हे आज (ता. 30 मार्च) सोलापूर दौऱ्यावर आले होते. महापालिका निवडणुकीदरम्यान मनसे विद्यार्थी सेनेचे शहरप्रमुख बाळासाहेब सरवदे यांच्या कुटुंबीयांची ठाकरे यांनी पुन्हा भेट घेतली.



या भेटीनंतर अमित ठाकरे यांनी आरोप जेलमध्ये बसून निवडून येतात, हे यंत्रणेचे अपयश आहे, अशी खंत व्यक्त केली.

सोलापूर महापालिका निवडणुकीच्या वेळी उमेदवारी अर्ज माघारी घेतल्यानंतर मनसेचे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांचा खून झाला होता. त्यावेळी अमित ठाकरे यांनी सोलापुरात तातडीने येत सरवदे कुटुंबीयांचे सांत्वन केले होते. त्यावेळी अमित ठाकरे यांनी सरवदे यांच्या मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली होती. त्यानंतर सरवदे कुटुंबाच्या भेटीसाठी अमित ठाकरे पुन्हा सोलापुरात आले होते.

सरवदे कुटुंबीयांच्या भेटीनंतर अमित ठाकरे म्हणाले, बाळासाहेब सरवदे यांचा खून झाला, त्या वेळी मी आलो होतो आणि आज त्यांच्या कुटुंबियांची भेट घेण्यासाठी आलो आहे. आज त्यांच्या मुली आनंदित होत्या, हे पाहून बरं वाटलं.

जेलमध्ये बसून आरोपी निवडून येतात, याचा अर्थ हे व्यवस्थेचं अपयश आहे. मुळात आरोपींना निवडणूक लढवता आली नाही पाहिजे. मात्र, जेलमध्ये बसून ते निवडून येतात, अशी खंतही अमित ठाकरे यांनी बोलून दाखवली.

**'पार्थ पवार-राज ठाकरे भेट कशासाठी मला माहिती नाही'**

पार्थ पवार-राज ठाकरे भेटीवर अमित ठाकरे यांनी ती भेट कशासाठी होती, हे मला माहिती नाही. मी गेल्यावर राज ठाकरेंशी चर्चा केली. त्यांची काय चर्चा झाली, ते मला माहिती नाही. अशोक खरात प्रकरण पत्रकारांनी शेवटपर्यंत नेले पाहिजे. त्याचा पाठपुरावा सोडू नये, अशी सूचनाही अमित ठाकरेंनी केली.

## करमाळ्यात १० दिवसांत ५ महिला बेपत्ता

### गुढ वाढल्याने पोलिस अलर्टवर

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातून गेल्या दहा दिवसांत पाच महिला आणि तरुण मुली बेपत्ता झाल्याच्या धक्कादायक घटना समोर आल्या आहेत. एकामागोमाग एक घडणाऱ्या या प्रकारांमुळे संपूर्ण तालुक्यात चिंतेचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटनांमुळे पालकांमध्ये कमालीची घबराट पसरली असून, यामागे काही संघटित टोळी सक्रिय आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस यंत्रणा तातडीने तपासासाठी कामाला लागली असून विविध मार्गांनी शोध सुरू आहे. एकाच भागातून इतक्या मोठ्या संख्येने महिला बेपत्ता झाल्याने पोलीस प्रशासनासमोर तपासाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

मिळालेल्या माहितीनुसर, सोलापूर जिल्ह्यातील करमाळ्यातून फक्त १० दिवसांत वेगवेगळ्या ठिकाणांहून ५ महिला बेपत्ता झाल्या आहेत. महिला बेपत्ता होऊ लागल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. महिला बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने करमाळा पोलिसही अलर्ट झाले आहे. पोलिसांनी या सर्व घटनांची गंभीर दखल घेत महिलांना शोधण्यासाठी विशेष पथके तैनात केली आहेत. करमाळा पोलिसांनी एक सुचना जारी केली आहे. ‘ बेपत्ता झालेल्या महिलां महिला किंवा तरुणींबाबत काहीही माहिती मिळाल्यास, त्यांनी त्वरित करमाळा पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल, असं आवाहन देखील पोलिसांनी केलं आहे.

२२ मार्च रोजी बोरगाव येथून ३५ वर्षीय महिला बेपत्ता झाल्यापासून या घटनांची मालिका सुरू झाली. त्यानंतर २३ मार्चला करमाळा शहरातून २१ वर्षीय तरुणी आणि मोरवड येथून २० वर्षीय युवती अचानक बेपत्ता झाली. हे सत्र येथेच न थांबता २५ मार्च रोजी पांगरे येथील ३५ वर्षीय महिला आणि उमरड येथील ५१ वर्षीय प्रौढ महिला देखील घरातून निघून गेल्या असून त्या अद्याप परतलेल्या नाहीत. अवघ्या चार दिवसांत २० ते ५१ वयोगटातील पाच महिला बेपत्ता झाल्याने संपूर्ण तालुक्यात चिंतेचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस प्रशासन या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करत आहे.

**परिसरात भीती आणि संभ्रम**

एकाच तालुक्यात अवघ्या १० दिवसात ५ महिला बेपत्ता झाल्याने महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ‘मुलींना एकटं बाहेर पाठवताना आता भीती वाटत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. तसेच, या घटनांमागे एखादी संघटित टोळी काम करतेय का कि कोणी वैयक्तिक कारणांसाठी असे





करत आहे, असा संशय व्यक्त केला जात आहे.

तालुक्यातून एकामागोमाग एक महिला बेपत्ता होण्याच्या धक्कादायक घटनांच्या पार्श्वभूमीवर करमाळा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगवान केली आहेत. पोलीस प्रशासनाने तालुक्यातील सर्व पोलीस पाटील आणि ग्रामसुरक्षा दलाला सतर्क राहण्याचे कडक आदेश दिले आहेत. संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी रेल्वे स्थानके, बस स्थानके आणि महत्त्वाच्या चेक पोस्टवरील सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी केली जात आहे. बेपत्ता महिलांचा शोध घेण्यासाठी स्थानिक पातळीवर विशेष पथके तैनात करण्यात आली असून, पोलीस प्रशासन सर्व यंत्रणांच्या मदतीने या प्रकरणाचा मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न करत आहे.

## राज्यात पुढील दोन दिवस अवकाळीचा तडाखा

### सोलापूरसह पश्चिम महाराष्ट्रात गारपिटीचा इशारा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात पुढील दोन दिवस अवकाळी पावसाची तीव्रता वाढणार असून, यामध्ये पुढील दोन दिवसांत काही जिल्ह्यांना गारपिटीसह जोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

यात मंगळवारी पुणे, सातारा,मंगळवारी पुणे, सातारा, सांगली, सोलापुरला तीव्रता अधिकसांगली, सोलापूर जिल्ड्यांचा समावेश आहे.

राजस्थान, आसाम,



रायलसीमा, दक्षिण कर्नाटकवर असलेली हवेची द्रोणीय स्थिती तसेच यातून वाहणाऱ्यावाऱ्यांच्या संघषार्मुळे सध्या देशाच्या अनेक भागांत अवकाळी पावसाने जोर पकडला आहे. यामुळे पुढील दोन दिवसांत राज्यातील काही जिल्हयांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

यात सोमवारी अहिल्यानगर, सोलापूर, बीड, लातूर, धाराशिव जिल्हयात ताशी ५० ते ६० किमी वेगाने वारे वाहत पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यात काही भागात गारपिटही होणार आहे. याशिवाय मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या अनेक जिल्हयांत पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

## तीन लाख कुटुंबांना रॉकेल; सोलापूर जिल्ह्यासाठी केरोसिनचा कोटा ठरला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** युद्धामुळे गॅस टंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. गॅस टंचाईवर तोडगा काढण्यासाठी शासनाने केरोसिन पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यात ज्यांना रॉकेल दिले जाणार आहे असे तीन लाख कुटुंब रेशनकार्डधारक असून त्यापैकी केवळ ३० हजार म्हणजे १० टक्के कुटुंबांकडेच स्टोव्ह असल्याचे समोर आले आहे.

एप्रिलमध्ये केरोसिनचा पुरवठा होणार आहे. सोलापूर शहरासाठी १२ हजार लिटर तर जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी १ लाख ३२ हजार लिटर केरोसिन मिळणार आहे. एप्रिलमध्ये सोलापूर शहर व ग्रामीणसाठी १ लाख ४४ हजार लिटर केरोसिनचा कोटा निश्चित झाला आहे. एका रेशनकार्डधारक कुटुंबाला तीन लिटर केरोसिन दिले जाणार आहे.

युद्ध स्थितीमुळे एलपीजीला पयार्यी इंधन म्हणून तात्पुरत्या स्वरूपात केरोसिन वितरणाचा निर्णय झाला आहे. गेल्या १० वर्षात स्टोव्ह वापराची संख्या प्रचंड घटली आहे. सोलापूर शहरात स्टोव्ह वापरणाऱ्या कुटुंबाचा सर्व्हे अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयाने केला. यामध्ये निराशाजनक माहिती समोर आली आहे.

शहरातील ३ लाख रेशनकार्डधारक कुटुंबांपैकी जेमतेम १० टक्क्यांच्या आतच





कुटंब स्टोव्ह वापरत असल्याचे समोर आले आहे. ग्रामीण भागातही अशीच परिस्थिती आहे. शासनाने तीन लिटर केरोसिन दिल्यानंतर आता अनेकांना नव्याने स्टोव्ह विकत घ्यावा लागणार आहे.

**वाटपाचे नियोजन**

ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही असे कुटुंब देखील केरोसीन उपलब्धतेनुसार केरोसिन वितरणास पात्र राहतील. स्थलांतरीत मजूर देखील केरोसीन उपलब्धतेनुसार केरोसिन वितरणास पात्र राहतील. रास्त भाव दुकानदार व किरकोळ केरोसीन परवानाधारक यांनी शिधापत्रिकाधारक/ शिधापत्रिकाधारक नसलेले लाभार्थ्यांना प्रति कुटुंब ३ लिटर प्रमाणे केरोसीन वाटप करणार आहेत.

एखाद्या गावामध्ये केरोसीन विक्रता उपलब्ध न झाल्यास त्या गावातील रहिवाशांना नजीकच्या गावातून केरोसीन उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

**वाटपचा अहवाल, निरीक्षण पथक**

जिल्ह्यातील वाटप, उचल, वितरण व शिल्लक याचा साप्ताहिक अहवाल अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाला पाठवावा लाणार आहे. केरोसीनच्या गैरवापरावर नजर ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर संयुक्त निरीक्षण पथक स्थापन केले जाणार आहे. केरोसिनचा वापर पेट्रोल/ डिझेलमध्ये भेसळ करण्याकरीता होणार नाही, याची विशेष दक्षता घेतली जाणार आहे.

## आषाढी वारीच्या 'टेंडरचा मेळा' भरणार सोलापूरमध्ये

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर आषाढी वारीसाठी तात्पुरत्या स्वरूपात पुरवण्यात येणाऱ्या सोयीसुविधांमध्ये सर्वाधिक खर्चाचा आकडा असलेल्या फिरत्या शौचालयाचे पुण्यासह सातारा आणि सोलापूरचे टेंडर आता पुणे जिल्हा परिषदेऐवजी सोलापूर जिल्हा परिषदेतून निघणार आहे.

ग्रामीण विकास मंत्री आणि सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पुण्याकडे असलेले शौचालयाचे टेंडर खेचून सोलापूरकडे नेले आहे. तसेच अहिल्या नगर नाशिक आणि जळगावमधीलही टेंडरचे दर सोलापूर जिल्हा परिषद ठरवणार असून एक प्रकारे आषाढी वारीच्या 'टेंडरचा मेळा' सोलापूरमध्ये भरणार आहे.

आषाढी वारीच्या काळामध्ये संत ज्ञानेश्वर माउली आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यासोबत असणारी फिरती



शौचालये, स्वच्छता संबंधित मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, पाणीपुरवठयासाठी टँकर आणि स्वच्छता दिंडीचे नियोजन तसेच आवश्यक औषधे खरेदी या कामांचे टेंडर पुणे, सातारा आणि सोलापूर या तीन जिह्यांसाठी पुणे जिल्हा परिषदेतून काढण्यात येत होते.

मात्र जयकुमार गोरे यांनी ही ई-टेंडर प्रक्रिया सोलापूर जिल्हा परिषदेमार्फत करण्याचे आदेश काढले आहेत. या टेंडरची किंमत जवळपास 100 कोटींच्या दरम्यान असेल.

**जलरोधक मंडप आणि जर्मन हंगरदेखील**

पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी जलरोधक मंडप व जर्मन हंगर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठीदेखील सोलापूर जिल्हा परिषदेने निविदा प्रक्रिया राबवावी, असेही या आदेशामध्ये म्हटले आहे.

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नाजज डांबरी रोडच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्धवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

## संपादकीय

# मागणी-पुरवठ्यातील गैरमेळ!

युद्धाच्या मॉकड्रिलमध्ये भारतीय नागरिक नापास झाले आहेत का? पुरेसा पुरवठा असूनही हवालदिल नागरिक गॅस-पेट्रोलच्या रांगेत उभे असलेले दिसतात. विरोधी पक्षांकडून समस्येचे राजकारण सुरू आहे. युद्ध जसे पुढे सरकते, तसे त्याचे युद्धामध्ये सहभागी नसलेल्या अन्य देशांवरही अप्रत्यक्ष परिणाम जाणवू लागतात. भारतात हे परिणाम जाणवू लागले आहेत. युद्धामुळे निर्माण झालेल्या तेल, गॅस व अन्य जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाईवर मात करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नांची शिकस्त करत आहे. पुरेसा साठा उपलब्ध झाल्यामुळे पंतप्रधानांपासून ते थेट जिल्हाधिकार्यांपर्यंत सर्व जनतेला पुरवठ्याविषयी दिलासा देत आहेत. तरीही भारतीय जनमानस मात्र टंचाईची पार्श्वभूमी समजून कृती करण्याच्या मानसिकतेत नाही. सर्वजण संयमाने वागण्याऐवजी वर्तनातून अगतिकता दाखवितो आहे. युद्धात सहभागी नसताना आणि अप्रत्यक्ष संकटाचा मुकाबला करताना ही स्थिती जर असेल, तर आपण युद्धकाळात परिस्थितीचा मुकाबला कसा करणार आहोत. खरे तर आखातातील युद्धातून देशवासीयांनी आपली मानसिकता तयार करण्याची गरज होती. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीत नाकेबंदी केल्यामुळे जगाचा 40 टक्के तेल पुरवठा अडचणीत सापडला. कतारमधील नैसर्गिक वायूचे प्रकल्प बेचिराख झाल्याने गॅसपुरवठा विस्कळीत झाला. होर्मुझ सामुद्रधुनीत इराणची क्षेपणास्त्रे तेलवाहू जहाजांना लक्ष्य करीत असताना भारतीय तिरंगा असणाया जहाजांचा मार्ग सुकर झाला. रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल आयात झाले. भारतात पुरेसा साठा उपलब्ध होतो आहे. पण नागरिक मात्र सैरभैर झाले आहेत. सर्वांना समान उपलब्धता व्हावी, यापेक्षा माज्या पदरात अधिक कसे पडेल, यासाठी नागरिकांचा आटापिटा सुरू आहे. पेट्रोल पंपावर, गॅस एजन्सीसमोर, जीवनावश्यक वस्तू विक्री करणारे मॉल्स, दुकाने यांच्यासमोर गर्दी होते आहे. काही ठिकाणी या संधीचा लाभ उठविला जातो आहे. 2022 पासून निरनिराळ्या युद्धांमध्ये हजारो निष्पाप मृत्युमुखी पडले. कोट्यवधी संसार रस्त्यावर आले. सुबत्तेत जगणाऱ्यांना बंकरच्या आश्रयाला जावे लागले. नागरिक अन्नाला मोताद आहेत. समुद्राचे पाणी पिण्यायोग्य करणाया प्रकल्पांना उद्ध्वस्त केल्यामुळे आखातात कोट्यवधी जनता पिण्याच्या पाण्यासाठी तडफडते आहे. तरीही या नागरिकांतील देशभक्ती तसूभरही कमी झालेली नाही. इराणमध्ये युद्धाचा सेनापती मारला गेला, तरी जनता देशाच्या रक्षणाला प्राधान्य देते आहे. इस्रायलमध्ये 16 वर्षांच्या मुली लष्करी गणवेश घालून युद्धासाठी सज्ज झाल्या आहेत. या युद्धांचे समर्थन करण्याचा प्रश्न नाही. भारताने शांतीचा रस्ता दाखविणारी भूमिका घेतली आहे. पण वेळ आली की, देशासाठी समर्पण करण्याकरिता नागरिक भौतिक गोष्टींना विसरून तळहातावर शीर कसे ठेवतात, याचे उदाहरण म्हणून त्याकडे पाहावयास आणि अनुकरणासही कोणाची हरकत नसावी. आखातातील युद्ध भडकले, तर ते भारताच्या हद्दीपर्यंत येणार नाही, अशी आज कोणीच खात्री देत नाही. कारण कंगाल पाकिस्तान यामध्ये हात धुऊन घेण्याची भाषा करतो आहे. एकूणच भारतातील सध्याची परिस्थिती ही युद्धपूर्व मॉकड्रिलसारखी आहे. पण या स्थितीत आपण कसोटीला उतरत नाही, हे दुर्दैव आहे. जेव्हा युद्ध भडकते, राष्ट्रावर संकटाचे ढग पसरतात, तेव्हा राजकारण बाजूला ठेवावे लागते. युद्धस्थितीत तेल आणि गॅस पुरवठ्याची जागतिक समस्या निर्माण होते, तेव्हा हे राष्ट्रीय संकट समजून त्याला सामोरे जाण्यासाठी संयुक्त संसदीय समितीने पुढाकार घेऊन देशाला एकत्रित आवाहन करण्याची गरज असते. आपल्याकडे या प्रश्नाचे विरोधी पक्षांकडून राजकीय भांडवल सुरू आहे. रस्त्यावर नागरिकांचे मोर्चे काढून विरोधी पक्ष अपरिपक्वतेचे दर्शन घडवत आहेत. भारतासारख्या समृद्ध लोकशाहीसाठी जशी सुजाण राष्ट्रप्रेमी नागरिक घडविण्याची गरज आहे, तसे परिपक्व विरोधी पक्ष निर्माण होणे ही काळाची गरज आहे. अन्यथा भारत जगाची तिसरी महासत्ता होईल, मोठी बाजारपेठ म्हणून जग त्याच्याकडे पाहील, जागतिक गुंतवणूकदार आकर्षित होतील. पण जेव्हा युद्धाचे संकट येईल, तेव्हा मात्र आपण बलवान असूच, असे छातीवर हात ठेवून ठामपणे सांगता आले पाहिजे.

# महावीर : अहिंसेचे तेजस्वी दीप

मानवजातीच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांनी आपल्या विचारांनी, तत्त्वज्ञानाने आणि आचरणाने संपूर्ण मानवजातीला एक नवी दिशा दिली. अशा तेजस्वी आणि कालातीत व्यक्तिमत्त्वांमध्ये भगवान महावीर यांचे स्थान अत्यंत उंच आहे. चैत्र महिन्यात साजरी होणारी महावीर जयंती ही केवळ धार्मिक उत्सव नसून ती मानवी मूल्यांचा जागर करणारी, आत्मपरीक्षणाची प्रेरणा देणारी आणि नैतिकतेचा मार्ग दाखवणारी एक महत्त्वपूर्ण पर्वणी आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात महावीरांचे विचार अधिकच सुसंगत आणि आवश्यक वाटतात.

भगवान महावीरांचा जन्म इ.स.पूर्व ५९९ मध्ये वैशालीजवळील कुंडलपूर येथे झाला. बालपणापासूनच महावीरांचा स्वभाव अत्यंत शांत, संयमी आणि करुणामय होता. त्यांना सांसारिक सुखांपेक्षा आत्मिक समाधान अधिक महत्त्वाचे वाटत असे. लहान वयातच त्यांनी समाजातील दुःख, अन्याय आणि विषमता यांचा सखोल विचार केला. त्यांच्या मनात सतत एक प्रश्न घोळत होता की मानवाला खरे सुख कसे मिळेल? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या प्रयत्नातूनच त्यांच्या जीवनाला एक वेगळी दिशा मिळाली.

वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनी सर्व सांसारिक बंधनांचा त्याग करून तपश्चर्येचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय अत्यंत कठीण होता, कारण त्यासाठी त्यांना कुटुंब, संपत्ती आणि सर्व सुखसुविधांचा त्याग करावा लागला. त्यांनी जवळपास बारा वर्षे अत्यंत कठोर साधना केली. या काळात त्यांनी उपास, ध्यान, मौन आणि आत्मसंयम यांचा कठोर अभ्यास केला. अनेक अडचणी, संकटे आणि अपमान सहन करूनही त्यांनी आपला मार्ग सोडला नाही. अखेरीस त्यांनी कैवल्यज्ञान प्राप्त केले आणि 'महावीर' म्हणून ओळखले जाऊ लागले.

महावीरांचे तत्त्वज्ञान अत्यंत व्यापक आणि जीवनोपयोगी आहे. त्यांनी पंचमहाव्रतांचा उपदेश केला. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. या पाच तत्त्वांमध्ये संपूर्ण नैतिक जीवनाचा सार दडलेला आहे. अहिंसा हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे केंद्रस्थान आहे. त्यांनी केवळ शारीरिक हिंसा टाळण्याचा उपदेश केला नाही, तर मन, वाणी आणि कृतीतून कोणालाही दुखावू नये, असा व्यापक संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक जीवामध्ये आत्मा आहे आणि प्रत्येकाला जगण्याचा समान अधिकार आहे. सत्य हा दुसरा महत्त्वाचा सिद्धांत आहे. महावीरांनी सत्याला सर्वोच्च स्थान दिले. त्यांनी सांगितले की सत्य म्हणजे केवळ खोटे न बोलणे नव्हे, तर न्याय, प्रामाणिकपणा आणि नैतिकता यांचे पालन करणे होय. आजच्या समाजात, जिथे असत्य आणि फसवणूक वाढत आहे, तिथे सत्याचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.

अस्तेय म्हणजे चोरी न करणे. परंतु त्याचा अर्थ केवळ भौतिक वस्तूंची चोरी टाळणे एवढाच नाही, तर दुसऱ्याच्या हक्कावर अतिक्रमण न करणे, अन्यायाने लाभ मिळवू नये, असा व्यापक अर्थ त्यामध्ये अंतर्भूत आहे. ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ही तत्त्वे मानवी जीवनाला संयम आणि संतुलन शिकवतात. ब्रह्मचर्य म्हणजे इंद्रियसंयम, तर अपरिग्रह म्हणजे अनावश्यक वस्तूंचा त्याग. आजच्या उपभोगवादी संस्कृतीत अपरिग्रहाचा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे.

महावीरांनी 'अनेकांतवाद' हा अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत मांडला. या तत्त्वानुसार कोणत्याही गोष्टीकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे योग्य नाही. प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. त्यामुळे सहिष्णुता आणि संवाद यांना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या समाजात वाढत्या मतभेदांच्या पार्श्वभूमीवर हा विचार अत्यंत उपयुक्त ठरतो. महावीरांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक सुधारणांसाठीही प्रेरणादायी आहे. त्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांचा विरोध केला. त्यांनी सर्वांना समानतेचा आणि बंधुत्वाचा संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्मांद्वारे उन्नती साधू शकते. हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारक होता.

महावीर जयंती हा दिवस या सर्व विचारांचे स्मरण करून देणारा आहे. या दिवशी जैन समाजात विविध धार्मिक कार्यक्रम, पूजा, प्रवचने आणि मिरवणुका आयोजित केल्या जातात. मंदिरांमध्ये विशेष सजावट केली जाते आणि महावीरांच्या मूर्तीची पूजा केली जाते. अनेक ठिकाणी दानधर्म आणि सामाजिक सेवा उपक्रम राबवले जातात. परंतु या उत्सवाचा खरा अर्थ केवळ या विधींमध्ये नसून त्यांच्या तत्त्वांचे आचरण करण्यात आहे.

आजच्या आधुनिक युगात, जिथे तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, परंतु मानवी मूल्ये कमी होत चालली आहेत, तिथे महावीरांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो. अहिंसा, सत्य आणि संयम या मूल्यांचा अवलंब केल्यास समाजात शांतता आणि समन्वय निर्माण होऊ शकतो. महावीरांच्या शिकवणुकीचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर पुढील अनेक शतकांपर्यंत समाजाच्या विविध स्तरांवर त्याचा परिणाम दिसून आला. भगवान महावीर यांनी दिलेला अहिंसेचा संदेश पुढे अनेक सामाजिक आणि राजकीय चळवळींचा आधार बनला. अहिंसा ही केवळ वैयक्तिक सद्गुण नसून ती समाजव्यवस्थेचा पाया ठरू शकते, हा विचार त्यांनी प्रत्यक्ष आचरणातून सिद्ध करून दाखवला. त्यांच्या या विचारांचा प्रभाव पुढील अनेक महान व्यक्तिमत्त्वांवरही पडला आणि त्यांनीही अहिंसेचा मार्ग स्वीकारून समाजपरिवर्तनाचे कार्य केले.

महावीरांनी मानवी जीवनाला केवळ बाह्य यशाच्या चौकटीत न मोजता, अंतर्मनाच्या शुद्धतेवर भर दिला. त्यांच्या मते, खरे सुख हे बाह्य संपत्ती, सत्ता किंवा प्रतिष्ठेमध्ये नसून आत्मिक समाधानात आहे. त्यामुळे त्यांनी आत्मसंयम, त्याग आणि साधेपणा यांना विशेष महत्त्व दिले. आजच्या काळात, जिथे माणूस अधिकाधिक भौतिक सुखांच्या मागे धावत आहे, तिथे महावीरांचे हे तत्त्वज्ञान आपल्याला थांबून विचार करण्यास भाग पाडते.

महावीरांच्या तत्त्वज्ञानातील अपरिग्रह हा विचार आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा ठरतो. अनावश्यक वस्तूंचा संचय, संसाधनांचा अतिरेक वापर आणि उपभोगवादी जीवनशैली यामुळे पर्यावरणावर मोठा ताण येत आहे. जर मानवाने अपरिग्रहाचा मार्ग स्वीकारला, तर नैसर्गिक संसाधनांचे जतन होईल आणि पर्यावरणीय संतुलन राखले जाईल. त्यामुळे महावीरांचे तत्त्वज्ञान केवळ आध्यात्मिक नाही, तर पर्यावरणपूरकही आहे.

त्याचप्रमाणे, अनेकांतवाद हा महावीरांनी दिलेला अत्यंत आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन आहे. या तत्त्वानुसार, कोणत्याही विषयाकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे चुकीचे आहे. प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. त्यामुळे संवाद, सहिष्णुता आणि परस्पर आदर यांना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या काळात, जिथे मतभेदांमुळे संघर्ष निर्माण होतात, तिथे अनेकांतवाद हा विचार समाजाला एकत्र ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो. महावीरांनी स्त्री-पुरुष समानतेचाही संदेश दिला. त्यांनी स्त्रियांनाही आध्यात्मिक प्रगतीची संधी दिली. त्या काळात, जेव्हा स्त्रियांना अनेक सामाजिक बंधनांमध्ये अडकवले गेले होते, तेव्हा महावीरांचा हा विचार अत्यंत प्रगत आणि क्रांतिकारक होता. त्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे.

महावीर जयंती साजरी करताना या सर्व विचारांचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. या दिवशी जैन समाजात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. मंदिरांमध्ये विशेष पूजा, अभिषेक आणि प्रवचने होतात. अनेक ठिकाणी मिरवणुका काढल्या जातात. तसेच, दानधर्म, अन्नदान आणि गरजूंना मदत करण्याचे उपक्रम राबवले जातात. परंतु या उत्सवाचा खरा अर्थ केवळ या बाह्य विधींमध्ये नसून त्यांच्या तत्त्वांचे आचरण करण्यात आहे.

आजच्या आधुनिक युगात, जिथे जीवन अधिक वेगवान आणि स्पर्धात्मक झाले आहे, तिथे माणसामध्ये तणाव, असुरक्षितता आणि असंतोष वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत महावीरांचे तत्त्वज्ञान आपल्याला मानसिक शांती आणि स्थैर्य मिळवण्याचा मार्ग दाखवते. ध्यान, संयम आणि आत्मपरीक्षण यांचा अवलंब केल्यास आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो.

महावीरांचे जीवन आपल्याला हे शिकवते की खरे महानत्व हे बाह्य यशामध्ये नसून आपल्या विचारांमध्ये आणि आचरणामध्ये असते. त्यांनी अत्यंत साधे आणि संयमी जीवन जगले, परंतु त्यांच्या विचारांची उंची अत्यंत महान होती. त्यांच्या जीवनातील प्रत्येक कृती ही मानवतेच्या कल्याणासाठी होती. त्यामुळेच त्यांचे तत्त्वज्ञान आजही तितकेच प्रेरणादायी आणि उपयुक्त आहे. महावीर जयंती हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या जीवनात कितपत अहिंसा, सत्य, अपरिग्रह आणि संयम या मूल्यांचा अवलंब करतो, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. जर आपण या तत्त्वांचा अंगीकार केला, तर आपण केवळ स्वतःचे जीवन सुधारू शकतो असे नाही, तर समाजातही सकारात्मक बदल घडवू शकतो.

आजच्या काळात, जिथे हिंसा, द्वेष, भ्रष्टाचार आणि असहिष्णुता वाढत आहे, तिथे महावीरांचे विचार आपल्याला योग्य दिशा दाखवतात. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपण शांततेचा, समतेचा आणि नैतिकतेचा मार्ग स्वीकारू शकतो. जर प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात थोड्याफार प्रमाणातही या तत्त्वांचा अवलंब केला, तर समाजात मोठा सकारात्मक बदल घडू शकतो. शिक्षणक्षेत्रातही महावीरांचे तत्त्वज्ञान अत्यंत उपयुक्त आहे. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांच्या विचारांचा समावेश शिक्षणात केला पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ बौद्धिक विकासच नव्हे, तर नैतिक आणि सामाजिक विकासही होईल. महावीरांचे तत्त्वज्ञान हे केवळ एका धर्मापुरते मर्यादित नाही. ते संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांमध्ये सार्वत्रिकता आहे. कोणत्याही धर्म, जाती किंवा संस्कृतीतील व्यक्तीने त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास त्याचे जीवन अधिक शांत, संतुलित आणि समाधानकारक होऊ शकते.

शेवटी असे म्हणता येईल की महावीर जयंती हा केवळ एक धार्मिक उत्सव नसून तो मानवतेचा उत्सव आहे. हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची, आपल्या जीवनातील त्रुटी सुधारण्याची आणि एक चांगले माणूस बनण्याची प्रेरणा देतो. भगवान महावीर यांचे तत्त्वज्ञान हे आजही तितकेच जिवंत आणि उपयुक्त आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण एक शांत, समतामूलक आणि नैतिक समाज निर्माण करू शकतो. त्यामुळे महावीर जयंती साजरी करताना त्यांच्या शिकवणुकीचा अंगीकार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत), ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

## स्मशानभूमीच्या दोन एकर जागेवरून लिंगायत समाजात फूट



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शांती चौक येथील दोन एकर जागा लिंगायत समाजातील संस्थेला देण्याच्या मुद्द्यांवरून लिंगायत समाजात फूट पडल्याचे चित्र असून, आ. देवेंद्र कोठे आणि सिद्धेश्वर देवस्थान यांची कोंडी झाली असून, आता सभागृहात झालेल्या ठरावावर कसा तोडगा काढायचा प्रश्न सत्ताधारी भाजपातील महापौर कोंड्याल यांच्यासमोर उभा राहिला आहे.

शनिवारी सायंकाळी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी यांच्या उपस्थितीत अक्कलकोट रोडवरील मठात तातडीची बैठक झाली. यावेळी आ. विजयकुमार देशमुखांसह सर्वपक्षीय नेत्यांची उपस्थिती होती. महापौर विनायक कोंड्याल यांनी घेतलेल्या चुकीच्या निर्णयाचा निषेध व्यक्त करण्यात आला.

अक्कलकोट रोडवरील शांतीधाम येथील दोन एकर जागा लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीसाठी देण्याच्या निर्णयात महापौर विनायक कोंड्याल आणि सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी राजकारण करत लिंगायत समाजामध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केला आहे.

## मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा महामंडळाच्या अध्यक्षपदी केंगनाळकर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा महामंडळाच्या अध्यक्षपदी शरणराज केंगनाळकर तर कार्याध्यक्षपदी विजय कुलथे यांची निवड करण्यात आली. महामंडळाची बैठक शनिवारी सायंकाळी वीरशैव भवन कार्यालय येथे झाली. प्रारंभी महात्मा बसवेश्वर महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी

मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष जगदीश पाटील, सचिव बसवराज सावळगी, उपाध्यक्ष केदार वनारोटे, खजिनदार अनिल परमशेट्टी, ट्रस्टी रेवणसिद्ध आवजे, गणेश चिंचोळी, आनंद मुस्तारे, सुदीप चाकोते, सिद्धेश थोबडे, माजी अध्यक्ष राजाभाऊ आलुरे, सचिन शिवशक्ती, आनंद मुस्तारे, प्रिया बसवंती, विजयकुमार बमगुंडे, प्राचार्य विद्यानंद स्वामी, नितीन कुलकर्णी, बसवराज बगले, गौरव जक्कापुरे, मनोज कलशेट्टी, गिरीश मंद्रूपकर, राम वाकसे यांची



प्रमुख उपस्थिती होती.

महामंडळाचे नूतन अध्यक्ष शरणराज केंगनाळकर म्हणाले, जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांची जयंती सोलापुरात मोठ्या प्रमाणावर व्हावी याकरिता महामंडळाकडून यंदा अधिक जोमाने प्रयत्न करण्यात येणार आहेत.

या जयंती उत्सवात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार असून सोलापूरकरांनी या उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहनही नूतन अध्यक्ष शरणराज केंगनाळकर यांनी याप्रसंगी केले.

नूतन कार्याध्यक्ष विजय कुलथे म्हणाले, महात्मा बसवेश्वर महाराजांचा विचार समाजातील तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी महामंडळाकडून प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीची वेळ रात्री १२ पर्यंत वाढवून मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही नूतन कार्याध्यक्ष विजय कुलथे यांनी सांगितले. ट्रस्टी अध्यक्ष जगदीश पाटील यांनी प्रास्ताविक तर आनंद मुस्तारे यांनी आभार प्रदर्शन केले.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात जागतिक क्षयरोग दिन विविध जनजागृती उपक्रमांसह साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २४ मार्च २०२६ रोजी 'जागतिक क्षयरोग दिन' सोलापूर येथील डॉ. कोटणीस स्मृती विभागीय रेल्वे रुग्णालय आणि वाडी येथील पॉलीक्लिनिकमध्ये विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करून साजरा केला. या आजाराचे समूळ उच्चाटन करण्याच्या राष्ट्रीय प्रयत्नांना पूरक ठरेल अशा प्रकारे, लाभार्थी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना क्षयरोगाविषयी (TB) लक्षणे, प्रतिबंध, वेळेवर निदान आणि प्रभावी उपचार जागृत करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित असलेल्या देगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या (PHC) वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनाली महिंद्रकर यांनी एक अत्यंत माहितीपूर्ण आणि ओघवते व्याख्यान दिले. त्यांनी क्षयरोगाची कारणे, लक्षणे आणि तो पसरण्याची माध्यमे कोणती आहेत ? यांविषयी सविस्तर माहिती दिली; तसेच, पूर्णपणे बरे होण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, रोगाचे लवकर निदान आणि डॉक्टरांनी सुचवलेल्या उपचार



पद्धतीचे काटेकोर पालन करणे किती महत्त्वाचे आहे, यावर विशेष भर दिला. उपस्थितांना संबोधित करताना, सोलापूर विभागाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक (CMS) डॉ. मंजुनाथ जी. एस. यांनी क्षयरोग निर्मूलनासाठी सुरू असलेल्या सातत्यपूर्ण राष्ट्रीय प्रयत्नांवर प्रकाश टाकला. तसेच, 'क्षयरोग-मुक्त भारत' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिक आणि समाजाचा सक्रिय सहभाग किती निर्णायक ठरतो, यावर त्यांनी भर दिला. त्यांनी लाभार्थ्यांना आरोग्यदायी सवयी अंगीकारण्यासाठी आणि या आजाराशी संबंधित सामाजिक कलंक (stigma) कमी करण्याच्या कार्यात योगदान देण्यासाठी प्रोत्साहित केले. वाडी येथील पॉलीक्लिनिकमध्येही विभागीय वैद्यकीय अधिकारी (DMO) डॉ. रघुनंदन आणि डॉ. श्रवण यांनी अशाच प्रकारचे एक जनजागृती सत्र आयोजित केले; ज्यामुळे या विभागातील रेल्वे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा हा उपक्रम अधिक व्यापक झाला. एकूण मिळून, या सत्रांमध्ये सुमारे १३० लाभार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला; जो समाजाचा या उपक्रमाला असलेला भक्कम प्रतिसाद आणि वाढती जागृती दर्शवतो. सोलापूर विभागाने साजरा केलेला 'जागतिक क्षयरोग दिन'हा उपस्थितांचा उत्साहपूर्ण सहभाग आणि माहितीचे अर्थपूर्ण आदानप्रदान यामुळे विशेष ठरला. या निमित्ताने भारतीय रेल्वेची जनआरोग्याप्रती असलेली कटिबद्धता आणि क्षयरोग निर्मूलनाच्या राष्ट्रीय मोहिमेला पाठिंबा देण्यात असलेली तिची सक्रिय भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

## 'आयडिएशन कॉम्पिटिशन ३.०' विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना चालना देणारी ठरेल - कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा

**मुंबई,(कटूसत्य वृत्त):-** : कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून नवकल्पनांना प्रोत्साहन देणारा आयडिएशन कॉम्पिटिशन ३.० हा उपक्रम उद्योजकतेकडे वाटचाल करणारा ठरेल, असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण सोसायटी आणि आयस्पार्क फांउडेशन यांच्या पुढाकाराने आयडिएशन कॉम्पीटीशन ३.० ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या कार्यक्रमात मंत्री लोढा बोलत होते.

अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा यांनी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत नवकल्पनांना चालना देणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी दिली. राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत पाटील यांनी राज्य नाविन्यता सोसायटी मार्फत राबविण्यात



येणाऱ्या योजनांची माहिती दिली.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर यांनी इनक्युबिशेनसाठी आवश्यक असलेली सर्व मदत विद्यापीठाच्या वतीने दिली जाईल. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि वाढता सहभाग पाहून स्टार्टअप इकोसिस्टमला मिळणारे बळ स्पष्ट होत आहे असेही त्या म्हणाल्या.

आयडिएशन कॉम्पिटिशन ३.० मध्ये ४०० विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या सहकार्याने, आयडिएशन कॉम्पिटिशन ३.० आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील ८ जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. ५० हून अधिक महाविद्यालयांमधील १३० गटांनी या स्पर्धेत सहभाग घेतला या स्पर्धेतून तीन विजेते लवकरच घोषित केले जाणार आहेत. विद्यार्थ्यांमधील

नाविन्यपूर्णतेला प्रोत्साहन देणे, त्यांना जोपासणे आणि वास्तविक जगातील आव्हानांवर उद्योजकीय उपाय विकसित करण्यासाठी सक्षम करणे, हे या स्पर्धेचे उद्दिष्ट आहे.२०२४ मध्ये सुरू झालेली ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण आणि उद्योजकीय संस्कृती रुजवण्यासाठी तयार करण्यात आली आहे. याद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्जनशील कल्पनांचे रूपांतर शाश्वत उद्योगांमध्ये करण्यास मदत केली जाते. हा उपक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांचे रूपांतर प्रभावी स्टार्टअपमध्ये करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देतो, ज्यामध्ये त्यांना मार्गदर्शन, निधीच्या संधी आणि इनक्युबेशन सपोर्ट मिळतो. आयडिएशन कॉम्पिटिशन ३.० हे 'प्री-इनक्युबेशन प्रोग्राम'च्या माध्यमातून या संकल्पनेला पुढे नेत हा कार्यक्रम अगदी सुरुवातीच्या कल्पनेपासून ते सक्षम स्टार्टअप विकसित करण्यापर्यंत मदत करतो. यामध्ये नाविन्यपूर्णता, समस्या निवारण आणि उद्योजकीय विचारसरणीवर भर दिला जातो, ज्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक साधने आणि इकोसिस्टम सपोर्ट मिळतो.

## वात्रटिका

### कहाणी सिलेंडरची

तेव्हाही आणि आताही
सिलेंडरचीच कमी आहे...
काही काळजी करू नये
सरकारची हमी आहे...
तेव्हा ऑक्सिजन नव्हता
मिळाला म्हणून जीव गेला...
आता गॅस सिलेंडरसाठी
उन्हात उभं राहून कोणी मेला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# प्रभाग क्रमांक 26 मधील अनेक नगरात पिण्याचे पाण्याची पाईपलाईनची कामे होणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक 26 मधील हेरिटेज फॉर्म, ज्योती नगर, बँक कॉलनी, बंडापा नगर, कोरे वस्ती, उद्धवनगर भाग एक- दोन, अमर नगर, स्वस्तिक नगर, शितल नगर, रजनीश रेसिडेन्सी, आर्यश रेसिडेन्सी, या नगरामध्ये नगरसेविका सौ राजश्री चव्हाण यांनी पिण्याचे पाईपलाईन आहे किंवा नाही याबाबत संबंधित नगरातील नागरिकांना घेऊन प्रत्यक्ष पाहणी केली होती. पाण्याची पाईपलाईन नसलेबाबत निदर्शनास आल्यानंतर सोलापूर महानगरपालिका आयुक्त सचिन ओंबासे यांना दिनांक 12/11/2025 रोजी निवेदन दिले होते. त्याबाबत संबंधित अधिकारी कंदलगावकर यांना विचारणा केली असता सदरचे पाण्याचे पाईपलाईनचे काम शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत हाती घेण्यात आले असून त्याबाबत येणाऱ्या एप्रिल महिन्यात जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव जाणार असून मंजुरी मिळाल्यानंतर लवकरच सदर कामाला सुरवात करणार आहोत असे कळविले आहे. त्यामुळे प्रदीघ काळापासून वरील नगरातील पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न मार्गी लागणार आहे.

याबाबत माजी नगरसेविका सौ राजश्री चव्हाण यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू केल्यामुळेच सदरचे पिण्याचे पाण्याचे प्रश्न मार्गी लागणार आहे. सदर बाबत संबंधित नगरातील नागरिकांना येत्या एक-दोन महिन्यात आपल्या नगरातील पाण्याचा प्रश्न मिटणार आहे असे कळविल्याने त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले की नगरसेवक असावा तर नगरसेविका सौ राजश्री चव्हाण यांचा सारखा असावा कारण त्यांचा कार्यकाल संपलेला असताना सुद्धा नागरिकांच्या अडीअडचणीसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करत आहेत व नागरिकांच्या समस्या सोडवीत आहेत जनसेवा हीच ईश्वर सेवा मनाशी बाळगून नागरिकांच्या समस्या निस्वार्थीपणे सोडवीत आहेत त्यामुळे भविष्यात आम्ही सर्व नगरातील नागरिक त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणार आहोत असे मनोगत व्यक्त केले व सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्याबद्दल आभार मानले आहे.

# खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी एमपीएससी पूर्वतयारी अर्थसहाय्य योजना

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पुणे येथील महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांसाठी एमपीएससी गट-ब (अराजपत्रित) सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी व मुलाखतीच्या तयारीसाठी प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत पात्र उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी रु. १०,०००/- व मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी रु. ५,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

सन २०२५-२६ मध्ये एमपीएससी गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुकांनी www.mahaamrut.org.in या संकेतस्थळावर अर्ज भरावा. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २७ एप्रिल २०२६ आहे.

अमृत तर्फे राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील अमृतच्या लक्षित गटातील, (ब्राह्मण, कायस्थ, कोमटी, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर, नायडू, कम्मा, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगूनथर, गुजराथी, ठाकूर, जाट, हिंदू नेपाली, भूमिहार, लोहाणा, कानबी, इत्यादी) उमेदवारांना 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) गट-ब (अराजपत्रित) सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी व मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी उत्तीर्ण उमेदवारांना प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य' योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेविषयी सर्व सूचना व माहिती केवळ अमृतच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. अर्ज प्रक्रियेसंबंधी शंका असल्यास संबंधित जिल्हा अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन अमृतचे व्यवस्थापकीय संचालक यांनी केले आहे.

# रोबोटिक सर्जरी : क्रांतिकारी बदल घडवणारी प्रणाली

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या युगात रोबोटिक सर्जरी ही आरोग्य सेवेत क्रांतिकारी बदल घडवणारी प्रणाली ठरत असून, तिचा प्रभावी वापर आणि सार्वजनिक-खासगी भागीदारी मजबूत करणे आवश्यक असल्याचे मत 'पल्स-2026' या कार्यक्रमात तज्ज्ञ डॉक्टरांकडून व्यक्त करण्यात आले. वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन आयोजित 'पल्स' 2026 या कार्यक्रमात "नेक्स्ट जनरेशन सर्जिकल रोबोटिक ट्रेनिंग' या विषयावर विशेष सत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात डॉ. सजल सेन, डॉ. अविनाश सुपे, डॉ. रूमा सिन्हा, डॉ. गगन प्रकाश आणि डॉ. चिन्नाबाबू सुंकावल्ली या तज्ज्ञांचा सहभाग होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अश्विन ताम्हणकर यांनी केले. या चर्चासत्रात रोबोटिक सर्जरीची कार्यपद्धती, तिचे फायदे आणि भविष्यातील संधी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तज्ज्ञांनी सांगितले की, रोबोटिक सर्जरीमध्ये 3-डायमेंशनल दृश्य, अधिक अचूक हालचाली आणि हातातील कंप कमी यामुळे शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित व प्रभावी होते. यामुळे सूक्ष्म स्तरावर काम करणे सर्जनसाठी सुलभ होते. तज्ज्ञांच्या मते, पारंपरिक व लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रियांच्या तुलनेत रोबोटिक सर्जरीत रुग्णाला कमी वेदना, कमी रक्तस्त्राव, संसर्गाचा धोका कमी आणि जलद बरे होण्याचा फायदा मिळतो.

अनेक प्रकरणांमध्ये रुग्णांना एक ते दोन दिवसांत रुग्णालयातून घरी सोडणे शक्य होत आहे. विशेषतः कर्करोग, मूत्ररोग, स्त्रीरोग तसेच जनरल सर्जरीमध्ये रोबोटिक तंत्रज्ञानाचा वापर

झपाट्याने वाढत असल्याचे निदर्शनास आले.

जागतिक पातळीवर जनरल सर्जरीमध्ये रोबोटिक प्रक्रियांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून भारतातही गेल्या काही वर्षांत या शस्त्रक्रियांची संख्या लक्षणीयरित्या वाढली आहे.

चर्चेदरम्यान तज्ज्ञांनी असेही नमूद केले की, रोबोटिक सर्जरीमुळे सर्जनला दीर्घकाळ कार्यरत राहणे शक्य होते, तसेच जटिल शस्त्रक्रिया अधिक अचूकतेने करता येतात.

स्त्रीरोग तज्ज्ञांनी तर आजच्या काळात शक्य असल्यास महिलांना ओपन सर्जरीची गरज नसून मिनिमल ॲक्सेस सर्जरीकडे वळले पाहिजे, असे मत व्यक्त केले.

रोबोटिक सर्जरीचा उगम 'नासा' च्या संशोधनातून झाल्याची माहिती देत, सुरुवातीला अंतराळात शस्त्रक्रिया करण्याच्या उद्देशाने ही संकल्पना विकसित करण्यात आली होती, असेही सांगण्यात आले. तसेच, सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक रुग्णांना लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी अधोरेखित केले. यामुळे ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य सेवांमधील दरी कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# कुशल व ज्ञानी युवकांनी शेतकऱ्यांना योग्य तांत्रिक मार्गदर्शन करावे- कृषी अधिकारी देशमुख

**माढा (कटूसत्य वृत्त):-** देशात हरितक्रांती झाल्यापासून कृषी क्षेत्रात आमुलाग्र बदल झाले आहेत.विविध प्रकारचे तंत्रज्ञान व कौशल्याच्या जोरावर अनेक शेतकरी कमीत कमी वेळात जास्तीत जास्त उत्पादन काढण्यासाठी व्यापारी पद्धतीने शेती करतात परंतु काही अशिक्षित शेतकऱ्यांना भरपूर कष्ट व मेहनत घेऊनही अपेक्षित उत्पादन व उत्पन्न मिळत नाही तेंव्हा जे सुशिक्षित व कुशल तंत्रज्ञानी बेरोजगार युवक कृषीपूरक व्यवसाय व उद्योग सुरू करतात त्यांनी संबंधित शेतकऱ्यांना योग्य तांत्रिक मार्गदर्शन करावे. शक्य असेल तर मोफत अथवा माफक दरात विविध सेवा व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात जेणेकरून त्यांची प्रगती व सुधारणा होऊ शकेल असे प्रतिपादन त्यांनी केले.



ते मानेगाव ता.माढा येथे सुरज ॲग्रो सर्व्हिसेसचे उद्घाटन करताना बोलत होते.

प्रास्ताविक धानोरे देवीचे माजी सरपंच औदुंबर देशमुख यांनी केले.

यावेळी बोलताना ग्रामपंचायत सदस्य तानाजी देशमुख यांनी सांगितले की, सध्या शेती व्यवसाय व शेतकरी प्रचंड अडचणीत सापडला आहे. तेंव्हा जे गोरगरीब व गरजू शेतकरी आहेत त्यांना मदत व सहकार्य करणे हे शासन,कृषी विभाग व मोठ्या सधन शेतकऱ्यांचे आद्यकर्तव्य आहे. अनेक वेळा शेतकऱ्यांना कृषीविषयक बाबींची शास्त्रशुद्ध माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे अचूक तंत्र अवगत नसल्याने त्यांचे मोठे नुकसान होऊन त्यांच्या पदरी घोर निराशा येते. हे टाळण्यासाठी ऐकमेकांना सहकार्य व मदत करणे गरजेचे असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. सूत्रसंचालन करून सहशिक्षक रावसाहेब मगर यांनी आभार मानले.

यावेळी विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याचे माजी संचालक निलकंठ पाटील, लक्ष्मण देशमुख, सरपंच तानाजी लांडगे, उपसरपंच सिद्धेश्वर राऊत, निलेश भोसले, औदुंबर देशमुख, उल्हास राऊत, आदर्श शिक्षक प्रदिप जाधव, राजेंद्र गुंड,विश्वनाथ पारडे, ग्रामसेवक सिद्धेश्वर माळी, प्रकाश देशमुख अमोल देशमुख, वैजिनाथ व्हळगळ, मंगेश देशमुख, राजाभाऊ भोगे, प्रकाश राऊत, सुरज देशमुख, शुभम देशमुख, रावसाहेब मगर, अभिलाष देशमुख, अनिल क्षीरसागर, कमलाकर दावणे, सचिन क्षीरसागर, शहाजी क्षीरसागर, गंगाराम मोहिते, पिंटू नागटिळक, मोहन क्षीरसागर, मधूकर पाटील, महेबुब शेख, अरुण जाधव, रघुवीर मोटे, बाबासाहेब नरवडे, प्रवीण लटके, यासीन शेख, विजय भोगे यांच्यासह ग्रामस्थ व युवक उपस्थित होते.

# सोलापूरात २४ मे रोजी १० वा धनगर समाज वधू-वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राजमाता सामाजिक प्रतिष्ठान, सोलापूरच्या वतीने आयोजित १० वा धनगर समाज वधू-वर पालक परिचय मेळावा रविवार, २४ मे २०२६ रोजी होणार आहे. नेहरू नगर येथील सुंदर मल्टिपर्पज हॉलमध्ये सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत हा सोहळा पार पडेल. अशी माहिती भाऊसाहेब चोरमुले यांनी दिली. महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील समाजबांधव ज्या सोहळ्याची प्रतीक्षा करत आहेत. त्या मेळाव्यात विवाह इच्छुक तरुण-तरुणींना योग्य जोडीदार निवडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. माहिती पुस्तिकेतील नोंदणीसाठी १५ एप्रिल २०२६ ही अंतिम तारीख असून, इच्छुकांनी वेळेत नावनोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी संस्थेचे संस्थापक रवींद्र नागणकेरी, अध्यक्ष सुहास गडदे, कार्याध्यक्ष उदयकुमार ठेंगले, उपाध्यक्ष आत्माराम देवडे व इतर संचालक परिश्रम घेत आहेत.

# भीम जयंती निमीत्त सम्राट प्रतिष्ठान विविध कार्यक्रम राबविणार- शशिकांत भोसले

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने, सम्राट प्रतिष्ठान अकलूज यांच्या वतीने विविध सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती सम्राट प्रतिष्ठानचे संस्थापक शशिकांत भोसले यांनी दिली.

प्रसार माध्यमांशी बोलताना सम्राट प्रतिष्ठानचे संस्थापक शशिकांत भोसले म्हणाले की महापुरुषांच्या विचारांची जयंती साजरी होणे गरजेचे आहे. सध्याच्या युगात तरुण पिढीला मोबाईलचे जास्त आकर्षण आहे, तरुण पिढी मोबाईलच्या जगात हरवत चालली आहे. आणि हे येणाऱ्या काळासाठी खूप घातक आहे असे वाटते.



कारण कृत्रिम बुद्धिमत्तेचा जास्त वापर होताना दिसत आहे. शिवाय वाचना पासून आपण दूर जाऊ लागलो आहे. याकरिता महापुरुषांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक उपक्रम राबवणे गरजेचे आहे, म्हणून आम्ही याही वर्षी अनावश्यक खचार्ला फाटा देऊन वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करणार असल्याचे सम्राट प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत भोसले म्हणाले.

सध्या अकलूज परिसरामध्ये सम्राट प्रतिष्ठानच्या वतीने राबवण्यात येणारे वेगवेगळे उपक्रम हे कौतुकास्पद ठरत आहेत. प्रत्येक महापुरुषांची जयंती साजरी करणे, जयंती निमित्त शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देणे, महिलांसाठी वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करणे यामुळे सम्राट प्रतिष्ठानचे सर्वत्र कौतुक होत आहे. राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक कार्यक्रमासाठी सम्राट प्रतिष्ठानचे संस्थापक शशिकांत भोसले व अध्यक्ष कोमलताई भोसले यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरते.

# भीम प्रतिष्ठानचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील भीम प्रतिष्ठानतर्फे विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी विविध क्षेत्रातील आठजणांची निवड करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक बाबा बाबरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पुरस्काराचे वितरण सोहळा येत्या रविवार दिनांक 5 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी 5.30 वाजता सोलापुरातील शिंदे चौकातील शिवस्मारक सभागृह येथे मसाप पुण्याच्या मुख्य कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक यांच्या हस्ते व समाज कल्याण सहाय्यक आयुक्त नागनाथ चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. याप्रसंगी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर ,जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत ,शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख नगरसेवक अमोल शिंदे ,ज्येष्ठ पत्रकार



प्रशांत माने ,दिगंबर भगरे, रावजी सखाराम हायस्कूलचे प्राचार्य भारत केत, उद्योजक पदमचंद राका , राजेंद्र शहा (कासवा ),उदय वैद्य ,विठ्ठल शिवशरण, डॉ. शिवाजी पवार, धर्मेंद्र माने आदींची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे बाबरे यांनी सांगितले. पुरस्काराचे हे 26 वे वर्ष आहे. या पत्रकार परिषदेस संयोजक अमित बाबरे , प्रतिष्ठानचे अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे, उपाध्यक्ष ॲड. विशाल मस्के , सचिव अकबर शेख ,कार्याध्यक्ष सिद्धांत बाबरे, , ॲड. स्वाती मस्के आदी उपस्थित होते. यांचा होणार पुरस्काराने सन्मान यावेळी भीमराव मोरे (सामाजिक), सीमा भंडारी (शैक्षणिक),बलभीम पारखे (कामगार), किरण बनसोडे (पत्रकारिता), रुक्मिणी लांबतुरे (गौरव पुरस्कार), प्रकाश शेळके( विशेष गौरव पुरस्कार), रेणुका हिरेमठ (सन्मानपत्र),प्राजक्ता सोलंकर (सन्मानपत्र) तर आदर्श पालक पुरस्कारासाठी कृष्णा व रत्नमाला माने यांची निवड करण्यात आली आहे. सन्मानचिन्ह ,सन्मानपत्र ,शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाला १ एप्रिलपासून प्रारंभ

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणाऱ्या या राज्यव्यापी अभियानाला १ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे. हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वारे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा राज्य शासनाचा मानस आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक गाव आरोग्य संपन्न केले जाणार आहे. या प्रस्तावित योजनेमुळे गावापासून ते राज्यस्तरावरील आरोग्य सेवांचे आणि यंत्रणांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत.

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधावर भर, हे आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणणे आणि त्यांच्यात आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये फक्त आजारांवर उपचार करण्यापेक्षा ते होऊ नयेत यासाठी सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि पोषण यासारख्या मूलभूत घटकांवरही विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. संसर्गजन्य आजारांसोबतच बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे असंसर्गजन्य आजार, माता-बाल आरोग्य आणि मानसिक आरोग्य यासारख्या विषयांनाही या मोहिमेत सामावून घेण्यात आले आहे. या अभियानात ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणा सक्रियपणे सहभागी होणार आहेत. गावागावात स्वच्छतेचा आणि आरोग्याचा जागर करून आरोग्यदायी गाव ही संकल्पना राबवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असणार आहे.

**सुदृढ गावांना मिळणार 'आरोग्यसंपन्न गाव' किताब**

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य स्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत तीन टप्प्यांवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती ही अभियानाच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवणार आहे. तर आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांच्या नेतृत्वाखालील कृती समिती प्रत्यक्ष कामाचे नियोजन करणार आहे. त्याचबरोबर गाव पातळीवर आरोग्याचे मूल्यांकन करण्यासाठी विशिष्ट निकष ठरवण्यात आले आहेत. या निकषांच्या आधारे ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना 'आरोग्यसंपन्न गाव' म्हणून गौरविण्यात येणार आहे. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रकमेचा पुरस्कार देऊन प्रोत्साहित केले जाणार आहे. या संपूर्ण अभियानासाठी राज्य सरकारने ८०.७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, गाव, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना कोट्यवधी रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत.

**२ ते ५ कोटींचे पुरस्कार**

राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करीत पहिला क्रमांक मिळवणाऱ्या जिल्हा परिषदेला ५ कोटी रुपये, दुसऱ्या क्रमांकाला ३ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकासाठी २ कोटी रुपये दिले जाणार आहेत. जिल्हा परिषदेनंतर पंचायत समिती स्तरावरही प्रोत्साहनासाठी मोठ्या रक्कमेची तरतूद आहे. ज्यामध्ये पहिल्या क्रमांकाला २ कोटी, दुसऱ्या क्रमांकाला १.५ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकाला १.२५ कोटी रुपये दिले जाणार आहेत. राज्यस्तरावर सर्वोत्तम ठरणाऱ्या ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयांना ७५ लाख रुपयांचा विशेष पुरस्कार दिला जाणार आहे.

उपआरोग्य केंद्रांना पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा आणि राज्यस्तरासाठी अनुक्रमे ५ लाख आणि २५ लाख रुपये दिले जाणार आहे. तर प्राथमिक आरोग्य केंद्रांना जिल्हास्तरावर १० लाख आणि राज्य स्तरावर ५० लाखांचा पुरस्कार दिला जाणार आहे. त्याचबरोबर गावांनाही पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा, विभाग राज्य स्तरासाठी अनुक्रमे २५ लाख, १ कोटी आणि ५ कोटी रुपयांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. हे अभियान दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या कालावधीत राबवले जाणार असल्याने, प्रत्येक वर्षी गावांना आपली कामगिरी सुधारण्याची आणि पुरस्कार मिळवण्याची संधी मिळणार आहे.

# कुस्तीगीरासाठी खुराक योजना ही उल्लेखनीय बाब- अमृता पुजारी



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून अक्कलकोट तालुक्यातील कुस्तीगीरासाठी खुराक योजना ही उल्लेखनीय बाब असून आम्हा कुस्तीगीरासाठी अभिमानास्पद असल्याचे मनोगत चौथ्या महिला महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा मान मिळवणाऱ्या अमृता पुजारी कोल्हापूर यांनी व्यक्त केले.

ते कुस्तीगीर टीम समवेत श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी अमृता पुजारी बोलत होते.

याप्रसंगी न्यासाचे पुरोहित विश्वंबर पुजारी, प्रवीण घाडगे, सरफराज शेख, कोल्हापूर येथील कुस्ती पंच दादा लवटे, महिला कुस्तीगीर-स्वाती शिंदे, अपेक्षा पाटील, प्राजक्ता बारड, सृष्टी कोरे, पुजा पाटील, तन्वी मगदूम, गौरी पाटील, नंदिनी सोनवणे, अस्मिता पाटील यांच्यासह श्री क्षेत्र अक्कलकोटचे वैभव नवगिरे, निखिल पाटील, एस.के स्वामी, राहूल इंडे, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, राजू पवार, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, श्रीनिवास गवंडी, तानाजी पाटील, अनिल बिराजदार , शरद भोसले, रमेश हेगडे, सुमित घाडगे, साहिल सय्यद, समर्थ शिंदे, धनंजय निंबाळकर, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, रोहित कदम, कल्याण देशमुख,विनायक भोसले, किरण साठे, विशाल घाडगे, धनंजय निंबाळकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# 'मानसिक आरोग्य क्षेत्रात परिवर्तन घडवण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता'

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** मानसिक आरोग्य सेवांसाठी पारंपरिक वैद्यकीय चौकटीपलीकडे जाऊन समुदायआधारित, सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील आणि सहकार्यावर आधारित मॉडेल विकसित करण्याची

गरज असल्याचे मत या क्षेत्रात काम करीत असलेल्या तज्ज्ञांनी अधोरेखित केले.

जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित दोन दिवसीय 'पल्स 2026' परिषदेत आयोजित

मानसिक आरोग्य विषयक सत्रात डॉ. हमिद दाभोलकर, राज मरीवाला आणि रत्नबोली रॉय यांनी या चर्चासत्रात सहभाग घेतला. त्यावेळी त्यांनी याबाबतीतली आपली भूमिका स्पष्ट केली. मानसिक आरोग्य ही केवळ डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील बाब नसून ती संपूर्ण समाजाशी निगडित असल्याचे



त्यांनी सांगितले. कंटेंट क्रिएटर प्राजक्ता कोळी यांनी चर्चासत्राचे संचालन केले.

डॉ. दाभोलकर म्हणाले, ग्रामीण भागात किंवा वेगवेगळ्या सामाजिक पार्श्वभूमीतील लोकांमध्ये मानसिक आरोग्याबाबत वेगवेगळ्या श्रद्धा आणि समजुती असतात. त्यामुळे सेवा देताना त्या-त्या संस्कृतीशी सुसंगत दृष्टिकोन आवश्यक आहे. भारतात मानसिक आरोग्य तज्ज्ञांची संख्या अत्यल्प असल्याने सर्वांना सेवा पोहोचविण्यासाठी समुदाय पातळीवरच प्रणाली उभी करणे अपरिहार्य आहे. आशा कार्यकर्त्या, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक प्रतिनिधी यांच्या सहभागातून घरपोच सेवा देणारी यंत्रणा उभी करता येऊ

शकते, असे त्यांनी नमूद केले. यावेळी सहकार्यात्मक आरोग्यसेवा या संकल्पनेवरही भर देण्यात आला.

तज्ज्ञ, सामान्य वैद्यकीय कर्मचारी आणि समुदाय यांच्यात समन्वय साधल्यास मानसिक आरोग्य व्यवस्थापन अधिक प्रभावी होऊ शकते, असे ते म्हणाले. रत्नबोली रॉय यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना, मानसिक आरोग्य पुनर्वसनाच्या प्रक्रियेतील सामाजिक पैलूंवर प्रकाश टाकला. अनेक रुग्ण दीर्घकाळ मानसिक आरोग्य संस्थांमध्ये राहिल्यानंतर समाजात परतताना त्यांच्यासमोर ओळख, उपजीविका आणि सन्मान या मूलभूत प्रश्नांचे आव्हान उभे

राहते. पुनर्वसन म्हणजे केवळ लक्षणमुक्त होणे नव्हे, तर 'मी कोण आहे' आणि 'माझे आयुष्य कसे घडवायचे' याचे उत्तर मिळणे होय, असे त्यांनी स्पष्ट केले. रोजगार, सामाजिक सहभाग आणि स्वाभिमान हे पुनर्वसनाचे महत्त्वाचे घटक असल्याचे त्यांनी सांगितले. क्लिनिकल उपचारांबरोबरच सामाजिक पुनर्वसनाला तितकेच महत्त्व देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

राज मरीवाला यांनी मानसिक आरोग्य क्षेत्रात केवळ नैराश्य किंवा चिंता यांसारख्या निदानांवर

लक्ष केंद्रित करण्याऐवजी सामाजिक कारणांकडे लक्ष देण्याची गरज व्यक्त केली. भारतातील आत्महत्यांच्या घटनांपैकी मोठा भाग हा सामाजिक घटकांमुळे घडत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे मानसिक आरोग्याचा विचार व्यापक सामाजिक संदर्भात करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी स्वयंसेवी संस्था, निधी देणाऱ्या संस्था आणि धोरणनिमार्ते यांना दीर्घकालीन आणि सर्वसमावेशक समुदायआधारित उपक्रमांना पाठबळ देण्याचे आवाहन केले. युवकांनीही आपल्या परिसरात मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करून सहकाऱ्यांना मदत करण्याची भूमिका निभावावी, असे त्यांनी सांगितले.